दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : ३४१ वा ▶ शनिवार दि. ७ ऑक्टोबर २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## राज्याला पाच उपमुख्यमंत्री, दोन मुख्यमंत्री करावेत: बच्चू कडू



**मुंबई ।** राज्याला दोन उपमुख्यमंत्री लाभल्याने पंढरपुरच्या विठुरायाच्या महापूजेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यंदा कार्तिकी यात्रेला विठ्ठलाची होणारी शासकीय पूजा अजित पवार करणार की देवेंद्र फडणवीस? याबाबतचा निर्णय न्याय आणि विधी विभाग करणार आहे. यावरुन प्रहार संघटनेचे नेते, आमदार बच्चू कडू यांनी सरकारला जोरदार टोला लगावला आहे. अजित पवारांना जेव्हा मुख्यमंत्री बनवायचे असेल, तेव्हा त्यांना पाच वर्षांसाठी मुख्यमंत्री बनवू. जेव्हा संधी मिळेल तेव्हा त्यांना मुख्यमंत्री करू, असे फडणवीस म्हणाले होते. यावरूनही बच्चू कडू यांनी खोचक टोला लगावला आहे.

## न्यूज कॉलम

### आयशरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**धुळे ।** मुंबई-आग्रा महामार्गावर सोनगीर ते बाभळे फाटादरम्यान आयशरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. कैलास बाबूराव बिरारे असे मृताचे नाव आहे. मृत बिरारे नरडाण्याकडून सोनगीरकडे येत होते. या प्रकरणी शिंदखेडा पोलिसांत आयशरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला. सोनगीरपासून दोन किलोमीटरवर शिरपूरकडून भरधाव येणाऱ्या आयशर (एमपी ४६, एच ०४९०) ने प्लॅटिना मोटारसायकल (एमएच ३९, एच १२४६) ला मागून धडक दिल्याने मोटारसायकलस्वार कैलास बिरारे गंभीर जखमी झाले. वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतीक देशमुख यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

### मुलीचे अपहरण; संशयितावर गुन्हा

**धुळे ।** नांदवण (ता.साक्री) येथून पंधरावर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले. याबाबत संशयिताविरुद्ध साक्री पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. अपहृत मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांच्या पंधरावर्षीय अल्पवयीन मुलीला गावातील संशयित प्रवीण राजू मोरे याने ३० सप्टेंबरला फूस लावून पळवून नेले. त्यावरून बुधवारी (ता. ४) सायंकाळी अपहरणाचा गुन्हा नोंद झाला.

# सरकारकडे मौजमजा करायला पैसे, पण रुग्णांच्या उपचारासाठी पैसे नाहीत

## सरकारची सीबीआय चौकशी करा, उद्धव ठाकरेंची मोठी मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या सरकारनंतर सरकारची दुर्दशा झाली आहे. नांदेडच्या प्रकरणानंतर आरोग्य यंत्रणेचे तीनतेरा वाजले आहेत. ठाणे, नांदेड, संभाजीनगर, नागपूर येथे रुग्णालयात गेलेल्या जीवाला जबाबदार कोण? आणि जबाबदारी कधी घेणार? असा सवाल उद्धव ठाकरेंनी सरकारला आहे. या सरकारकडे गुवाहटी, गोव्याला जाऊन मौजमजा करण्यासाठी पैसे आहेत परंतु रुग्णांवर उपचार करायला पैसे नव्हते. त्यामुळे या सरकारची नि:पक्षपातीपणे सरकारची सीबीआय चौकशी मागणी उद्धव ठाकरेंन केली आहे.

विषय रोज नवीन नवीन आहेत. काही विषय खूप वर्षांपासून तसेच्या तसे आहेत. आज मी जरा अस्वस्थ आहे. सध्या आरोग्य यंत्रणेचे तीन तेरा वाजलेत, ते बघितल्या नंतर चीड येते. आज मी मुख्यमंत्री नाहीये, मविआ सरकार नाहीये. आरोग्य व्यवस्था तीच आहे. कोरोना सारख्या संकटाचा सामना केला. त्याच आरोग्य व्यवस्थेचे तीन तेरा वाजलेत, असं उद्धव ठाकरे म्हणाले. गुवाहटीमध्ये टेबलवर नाचायला पैसे आहेत, मजामस्ती करायला पैसे आहेत, पण औषधासाठी पैसे नाहीत का ? असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला. एक फूल दोन हाफ कुठे आहेत. सरकारकडे औषधांसाठी पैसे नाही म्हणता, पण परदेश दौरा सुरु आहे, जाहीरातबाजी करण्यासाठी सरकारकडे पैसे कुठून येतोय, असा थेट सवाल त्यांनी केला.



### एक फुल दोन हाफ कुठे?

**रोज काही विषय समोर येत आहे. काही विषय जशेच्या तसे आहेत. दसरा मेळाव्यात मी विस्ताराने बोलणार आहे. परंतु सध्या मी अस्वस्थ आहे. कारण आरोग्य यंत्रणेचे तीन तेरा वाजले आहेत हे बघून संताप येत आहे. कोरोनाचा संकट होतं तेव्हा मविआचा सरकार होते. आरोग्य यंत्रणा तीच आहे. या आरोग्य यंत्रणेने कोरोनाचा सामना केला. ड्रोनने सुद्धा औषध पुरवठा केला गेला होता. लसीकरण झालं, औषधांचा पुरवठा व्यवस्थित झाला. योध्यासारखे हे सगळे लढले त्या आरोग्य यंत्रणेला बदनाम केलं जाताय याला जबाबदार कोण? आता एक फुल दोन हाफ कुठे? असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला आहे.**

### डीनवरच गुन्हा का दाखल केला?

**राज्यात रुग्णांचे बळी जात असताना मुख्यमंत्री दिल्लीत जाऊन बसलेत नक्षलवादीचा सामना कसा करायचा? याचे उत्तर शोधत आहे. हे तर मुख्यमंत्र्यांनी शोधले पाहिजे. पण फक्त नांदेडच्या डीनवरच गुन्हा का दाखल केला? कळवा, संभाजीनगरला तेच झालं तिथे गुन्हा दाखल का झाला नाही ? असा सवाल उद्धव ठकरेंनी उपस्थित केला. खासदारांनी डीनला शौचालय साफ करायला लावला म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला का? असेही उद्धव ठाकरे म्हणाले.**

### रेट कार्ड ठरलेले

**ठाकरे म्हणाले, सध्या एक व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये चंद्रपूरच्या रुग्णालयात औषध लिहून दिली जातात मात्र हे औषध बाहेरून आणावी लागतात मग योजनांचा फायदा कुठे होतोय का ? साथ आहे ती भ्रष्टाचाराची जिथे जिथे औषध पुरवठा झाला नाही तिथे कोणाचे दलाल बसलेत. निविदा प्रक्रिया राबवली जात नाही.**

### डॉक्टर परदेश दौऱ्यावर

**ठाकरे म्हणाले, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयात शिवसैनिकांनी जा, तिथे वस्तुस्थिती काय आहे डीन अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन समजून घ्या. मनुष्यबळ कमी होत ते आधी सुद्धा कमी आहे. मनुष्यबळाचा कारण देतात ते कोरोना काळात सुद्धा होते. यामागचे खरे कारण भ्रष्टाचार आहे. कोर्टाने राज्य सरकारला काहीतरी निर्देश द्यावेत त्यांना खडसावले पाहिजे .**

कोरोना काळात सरकारने योग्य काम केले. आम्ही दुर्गम भागात औषधे पुरवलीत. अनेक डॉक्टर नर्सचा मृत्यू कोरोनाशी लढताना झाला. आज त्यांना बदनाम केलं जातंय. एक फुल एक हाफ दिल्लीत आहेत दुसरा हाफ कुठे आहे? असा खोचक टोला त्यांनी लगावला.मुख्यमंत्री शिंदे सध्या दिल्लीत आहेत. नक्षलवाद विरोधात कसा लढायचं यासाठी ते तेथे आहेत. ते पण महत्वाचं आहे. पण आता ज्या घटना घडल्या त्या ठिकाणी मुख्यमंत्री यांनी जायला हवं. नांदेड मध्ये डीन वर सदोषमनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आलाय. मग फक्त नांदेड मध्येच का? ठाण्यात देखील घटना घडली. मग तिथे का नाही कारवाई केली, असा सवाल त्यांनी केला. नांदेडच्या डीनला एका खासदाराने शौचालय साफ करायला लावलं. त्याच्यावर अट्रोसिटी गुन्हा दाखल झालाय. पण, नांदेड मध्ये डीन वर सदोषमनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आलाय. त्यामुळे त्यांच्यावर दबाव टाकण्यासाठी गुन्हा दाखल केलाय का, असा प्रश्न ठाकरेंनी विचारला.

औषधे खरेदी केली जात नाहीये. औषधांचा तुटवडा असल्याचं सांगितलं जात आहे. यामागे कोण आहे? कोरोना काळात औषधांचा तुटवडा नव्हता मग आता कसा तुटवडा पडतोय. सगळा भ्रष्टाचार सुरू आहे. औषधे खरेदी केली जात नाही आहेत. जो आरोग्यमंत्री हाफकीन कोण असं विचारतो त्याचबद्दल काय बोलणार, असं ते म्हणाले.

# अजितदादा गट पक्षाची घटनाच मानायला तयार नाही

### आयोगातील सुनावणीनंतर शरद पवार गटाचा आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**



'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कोणाचा? हे ठरवण्यासाठी पक्षाची घटना पाहू नका, अशी मागणीच आज अजित पवार गटाकडून निवडणूक आयोगाला करण्यात आली. अजितदादा गट पक्षाची घटनाच मानायला तयार नाही. त्यांची ही मागणी अत्यंत चुकीची आहे', अशी टीका शरद पवार गटाकडून करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव व निवडणूक चिन्ह यावर आज केंद्रीय निवडणूक आयोगात सुनावणी झाली. स्वत: शरद पवारही यावेळी उपस्थित होते. सुनावणीनंतर शरद पवार गटाकडून आयोगात बाजू मांडणारे ॲड. अभिषेक मनु सिंघवी यांनी सुनावणीत नेमके काय झाले व त्यावर शरद पवार गटाची काय भूमिका आहे? याविषयी माहिती दिली.

ॲड. अभिषेक मनु सिंघवी म्हणाले, दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आमचे म्हणणे ऐकण्यापूर्वीच केवळ अजित पवार गटाच्या याचिकेवरुन राष्ट्रवादीत फूट पडली असल्याचे दिसत आहे, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. आमचे म्हणणे ऐकल्याशिवाय निवडणूक आयोग अशी टीप्पणी कशी काय करू शकतो? त्यामुळे कोणतीही टीप्पणी करण्यापूर्वी आमचे म्हणणे ऐकून घ्यावे, अशी विनंती आम्ही केली आहे. त्यावर अजित पवार गटाने संपूर्ण बाजू मांडल्यानंतर तुम्हालाही पूर्ण संधी दिली जाईल, असे आम्हाला आयोगाकडून आश्वासित करण्यात आले आहे. दरम्यान, अजित पवार गटाकडून निवडणूक आयोगात दाखल करण्यात आलेल्या आमदार व पक्षसदस्यांच्या शपक्षपत्रांवरही ॲड. अभिषेक मनु सिंघवी यांनी आक्षेप घेतला आहे. ॲड. अभिषेक मनु सिंघवी म्हणाले, निवडणूक आयोगात दाखल करण्यात आलेली अनेक कागदपत्रे चुकीची आहेत. ज्या व्यक्तींचा मृत्यू झाला आहे, त्यांचेही शपथपत्र दाखल करण्यात आला आहे. काहींचे म्हणणे आहे आम्ही कशावरच हस्ताक्षरे केली नाहीत, तरीही त्यांच्या सहीचे कागदपत्रे निवडणूक आयोगात दाखल झाले आहे. हे सर्व आम्ही निवडणूक आयोगाला निदर्शनास आणून देणार आहोत.

# खा.राहुल गांधींना रावणाची उपमा देणाऱ्या भाजपाचा काँग्रेसतर्फे निषेध



**धुळे । प्रतिनिधी**

सर्व आघाड्यांवर अपयशी ठरलेल्या आणि इंडिया आघाडीला घाबरलेल्या भाजपाने नैराश्यातून देशाचे नेते खा.राहुल गांधी यांचा फोटो रावणाच्या रुपात आपल्या सोशल मीडीयावर प्रसारीत केला आहे. खा.राहुल गांधी यांना रावणाची उपमा देणार्या राक्षसी प्रवृत्तीच्या भाजपाचा आम्ही जाहीर निषेध करतो, असे म्हणत जिल्हा काँग्रेसच्या पदाधिकार्यांनी आज सकाळी काँग्रेसभवनासमोर तीव्र निदर्शने केली. यावेळी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

काँग्रेस पक्षाचे नेते खा.राहूल गांधी यांचा फोटो रावणाच्या रुपात संणकाद्वारे एडीट करुन भाजपाने आपल्या सोशल मीडियावर प्रसारीत केला. भाजपाच्या अशा राक्षसी विचारसरणी व प्रवृत्तीविरोधात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आ.नाना पटोले, काँग्रेस विधीमंडळ नेते आ.बाळासाहेब थोरात आणि काँग्रेस कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली धुळे जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्यावतीने काँग्रेस भवनाच्या आवारात तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात काँग्रेसचे धुळे जिल्हा शहर निरीक्षक हेमंत ओगले, काँग्रेस जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर, बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल भामरे, काँग्रेसचे धुळे तालुका अध्यक्ष डॉ.दरबारसिंग गिरासे, बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, माजी सभापती गुलाबराव कोतेकर, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा गायत्री जयस्वाल, माजी पं.स. सभापती भगवान गर्दे, खरेदी विक्री संघाचे चेअरमन लहू पाटील, शिरपूर तालुका अध्यक्ष मनोहर पाटील, आसिफ खान, मोहन पाटील, माजी पं.स.सदस्य पंढरीनाथ पाटील, बाजार समितीचे संचालक एन.डी. पाटील, काँग्रेसचे साक्री तालुकाध्यक्ष भानुदास गांगुर्डे, जि.प.सदस्य, प्रवीण चौरे, अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष हसन पठाण, प्रकाश पाटील, राजेंद्र देवरे, विलास बिरारी, निंबा भोये आदी सहभागी झाले होते.

# निसर्गाने तारलं मात्र बाजारभावाने मारले

### दर नसल्याने शेतकऱ्यांनी टोमॅटो रस्त्यावर फेकला

**नाशिक । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यात टोमॅटोला योग्य दर मिळत नसताना शेतकरी आक्रमक झाले आहेत बाजार समिती समोर असलेल्या वणीच्या सुरत नाशिक महामार्गावर शेतकऱ्यांनी टॉमॅटो फेकत रस्ता रोको केला आहे. यावेळी रस्त्यावर टोमॅटोच्या कॅरेट ओतून हे शेतकऱ्यांकडून आंदोलन करण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून टोमॅटोला योग्य तो दर मिळत नसताना टोमॅटो उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे. त्यावेळी टोमॅटोला योग्य हमीभाव द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

निसर्गाने तारलं मात्र बाजारभावाने मारलं अशीच परिस्थिती सध्या नाशिक जिल्ह्यातील टोमॅटो उत्पादकांची झाली आहे. दोन ते तीन महिन्यापूर्वी टोमॅटोला अडीच ते तीन हजारापर्यंत प्रतिक्रेटला मिळत असलेला बाजार भाव बघता नाशिक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात टोमॅटोची लागवड करण्यात आली. मात्र शेतकऱ्यांना ही कल्पनाच नव्हती कि आपला टोमॅटो हा कवडीमोल भावात विकला जाईल. एकीकडे दुष्काळाची परिस्थिती असतानाही शेतकऱ्यांनी टोमॅटो पीक मोठ्या कष्टाने जगविले आणि पिकविले मात्र सध्या मिळत असलेला बाजार भाव ७० ते १०० रुपये कॅरेट यात साधा टोमॅटो खुडण्याचा आणि बाजारात नेई पर्यंतचा खर्च सुद्धा निघत नसल्याने अनेक शेतकऱ्यांच्या भावनांचा लाल चिखल झाला आहे.मात्र या कष्टाचे चीज शेतकऱ्याचे होत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी टोमॅटो पीक शेतातून काढून टाकण्यास आलेल्या शेतमालाच योग्य भाव मिळत नसताना फेकण्यास सुरुवात केली आहे.

# ड्रग्ज निर्मितीचा कारखानाच उध्वस्त

### मुंबई पोलिसांची कामगिरी

**नाशिक । प्रतिनिधी**

ड्रग तस्कर ललित पाटीलचे प्रकरण राज्यभरात गाजत असताना आता नाशिकमधून मोठी अपडेट या संदर्भात आली आहे. ललित पाटीलचा भाऊ भूषण पाटीलचा नाशिकस्थित असलेला ड्रग्ज निर्मितीचा कारखानाच उध्वस्त करण्यात आला आहे. मुंबई पोलिसांनी ही कारवाई केली असून नाशिक शहर पोलिसांच्या हद्दीत कोट्यवधींच ड्रग्ज सापडल्याने खळबळ उडाली आहे.

काही दिवसांपूर्वीच ड्रग्ज माफिया ललित पाटील पुण्यातील ससून रुग्णालयातुन पोलिसांच्या हाती तुरी देऊन फरार झाल्यानंतर मोठी खळबळ माजली होती. त्यानंतर ड्रग्ज विरोधी कारवाईसाठी पोलीस क्शन मोडवर आले असून याच पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. ललित पाटील हा मूळचा नाशिकचा असून तो फरार झाल्यानंतर नाशिकच्या घरी देखील पोलिसांकडून झाडाझडती घेण्यात येत होती. या माध्यमातून साकीनाका पोलिसांचा तपास सुरु असताना धक्कादायक माहिती समोर आली असून तब्बल तीन दिवसांच्या कारवाईतून नाशिकमध्येच ड्रग्ज बनविण्याचा कारखाना असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. नाशिकमधील श्री गणेशाय इंडस्ट्रीज या कंपनीत ड्रग्ज बनविण्याचे काम सुरु होते. विशेष म्हणजे नाशिक पोलिसांच्या नाकावर टिच्चून ड्रग्ज निर्मिती सुरू होती, त्यामुळे



आश्चर्य व्यक्त केले जात आहे. दरम्यान साकीनाका पोलिसांकडून तीन दिवस कारवाई सुरु होती. यात ड्रग्ज माफिया ललित पाटील याचा भाऊ भूषण पाटील हाच नाशिकमध्ये श्री गणेशाय इंडस्ट्रीजच्या नावाने ड्रग्ज निर्मिती करत असल्याचे समोर आले. या कारवाईत मुंबई पोलिसांना ड्रग बनविण्याचा दीडशेहुन अधिक किलोचा कच्चा माल सापडला असून पोलिसांनी हा कारखानाच उद्धवस्त केला आहे. या प्रकरणी कंपनी मालकासह कामगारांना मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. या कारवाईनंतर राज्यातील ड्रग्जचं मोठं रॅकेट समोर येण्याची शक्यता आहे. नाशिकमध्ये मागील काही महिन्यात ड्रग्ज सापडल्याच्या अनेक घटना समोर आलेल्या होत्या. त्यामुळे याच कारखान्यातून ड्रग्जचा पुरवठा होत होता कि काय असा सवाल उपस्थित होतो आहे.


पुण्यातील ससून रुग्णालयातून ड्रॅग्स रॅकेट चालवणारा ड्रॅग माफिया ललित पाटील पोलिसांच्या तावडीतून पळून आहे. सध्या त्याला शोधण्यासाठी विविध पथके रवाना झाली आहेत.

# देवपूर स्मशानभूमीची दुरावस्था पाहून आ. शाह यांनी दिला २० लाखांचा निधी

**धुळे । प्रतिनिधी**

देवपूर येथील स्मशानभूमीची अवस्था अतिशय दयनिय झाली आहे. ज्या ओट्यांवर मृतदेह जाळले जातात, ते ओटे जीर्ण झाल्याने मृतदेह पडण्याची भिती असते. याबाबत नागरिकांनी आ.फारुख शाह यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानंतर आ.शाह यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सोबत घेवून स्मशानभूमीची पहाणी केली. स्मशानभूमीतील ओट्यांची झालेली दुरस्था पाहून त्यांचेही मन हळहळले. त्यामुळे त्यांनी स्थानिक विकास निधीतून लागलीच २० लाख रुपयांचा निधी दिला. तसे पत्र आयुक्त अमिता दगडे-पाटील यांना सुपूर्द केले. इतकेच नव्हेतर आणखी निधी लागल्यास मला सांगा, असेही ते म्हणाले.





आमदारांची ही संवेदनशीलता पाहून धुळेकरही भारावून गेले. स्मशानभूमीच्या पहाणीप्रसंगी आ.शाह यांच्यासोबत मनपा आयुक्त अमिता दगडे-पाटील, शहर अभियंता कैलास शिंदे, विद्युत विभागाचे उपअभियंता नरेंद्र बागुल, नगरसेवक नासिर पठाण, नगरसेवक सईद बेग, नगरसेवक गणी डॉलर तसेच कैसर अहमद, शहजाद मंसूरी, जुबेर खान, अशोक मराठे, दीपक माळी, संतोष गवळी, हर्षल माळी, नानाभाऊ माळी, तुषार चौधरी, पंकज गुरव, अनिल मराठे आदी उपस्थित होते. देवपूर स्मशानभूमीतील अनेक ओटे मोडकळीस आले आहेत. ओट्यावरील लोखंडी जाळी, रेलिंग तुटलेली आहे. त्यामुळे मृतदेहांना अग्नीडाग देताना अनेक समस्या निर्माण होतात. सरण रचातांना मृतदेह पडेल की काय? अशी भीती नागरिकांमध्ये असते. याबाबत नागरिकांच्या अनेक तक्रारी आ.फारुख शाह यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. म्हणून आज आ.फारुख शाह यांनी देवपूर स्मशानभूमी येथे पहाणी केली. स्मशानभूमीतील ओट्यांची दुरवस्था पाहून त्यांचेही मन हेलावून गेले. त्यामुळे त्यांनी लागलीच आमदार निधीतून २० लाख रुपयांचा निधी देण्याचे जाहीर केला. आणि तसे पत्र आयुक्त अमिता दगडे-पाटील यांच्याकडे सुपूर्द केले. शिवाय ओट्यांच्या दुरुस्तीसाठी आणखी निधी लागल्यास मला सांगा, मी उपलब्ध करुन देईल, असा शब्दही त्यांनी दिला. आमदारांची ही संवेदनशीलता पाहून उपस्थित मान्यवर अक्षरशः भारावून गेले.दरम्यान, स्मशानभूमीत लाकडांची कमतरता भासत होती. त्यामुळे आ.शाह यांच्या प्रयत्नातून देवपूर स्मशानभूमी येथे गॅस दाहिनी तर चितोडरोड स्मशानभूमीत विद्युत दाहिनीचे काम प्रगतीपथावर आहे. सुमारे दीड कोटी रुपये खर्चातून हे काम केले जात आहे. लवकरच हे काम पूर्ण होणार असल्याचेही आ.शाह यांनी यावेळी सांगितले.

# आज रिगमन, वरिष्ठ सहायक तर उद्या विस्तार अधिकारी पदासाठी परिक्षा

**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषदेच्या वतीने विविध संवर्गांसाठी पदभरती करण्यात येत आहे. दि. ५ ऑगस्ट रोजी या पदभरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या जाहिरातीच्या अनुषंगाने आज रिगमन (दोरखंडवाला), वरिष्ठ सहायक (लेखा) तर उद्या विस्तार अधिकारी (सांख्यिकी) पदासाठी परीक्षा घेण्यात येणार आहे. रिगमन (दोरखंडवाला) या पदाठी १७, वरिष्ठ सहायक (लेखा) ७६२ परीक्षार्थींची परीक्षा होणार आहे. तर दि. ८ रोजी विस्तार अधिकारी (सांख्यिकी) पदासाठी १२८१ परीक्षार्थी परीक्षेसाठी प्रविष्ठ होणार आहेत.

जिल्हा परिषद गट क भरती प्रक्रिया परीक्षेच्या पूर्वतयारीचा दि.२७ रोजी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी आढावा घेतला. तर काल दि. ६ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व ऑफिसर, परीक्षेशी संबधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेऊन सूचना दिल्या. त्याचबरोबर त्यांनी परीक्षा केंद्रांना देखील भेटी दिल्या. आयबीपीएस कंपनीच्या वतीने काल दि. ६ रोजी सकाळी १० ते १२ वाजेदरम्यान सर्व ऑफिसर व संबधित अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले.

## क्रिकेटोत्सवाची पर्वणी!

गणेशोत्सव झाल्यावर आता सर्वांनाच दसरा दिवाळीचे वेध लागले आहेत, मात्र, अब्जावधी क्रिकेट शौकीन 'वर्ल्ड कप येती घरा, तोचि दिवाळी-दसरा'चा गजर करीत असणार. १९८३ मध्ये भारताने अनपेक्षितपणे वन-डे क्रिकेट वर्ल्ड कप जिंकला. या विजेतेपदाची ४० वर्षे साजरा होत असतानाच भारताने तिसऱ्यांदा वर्ल्ड कप उंचवावा, अशीच तमाम क्रिकेटप्रेमींची अपेक्षा आहे. भारतीयांसाठी वर्ल्ड कप हा केवळ क्रिकेटचा असतो, हे चित्र काही वर्षांपासून काही प्रमाणात बदलत असले, तरी क्रिकेटची क्रेझ कायम आहे आणि क्रिकेट वर्ल्ड कपच्या वेळी सर्व भारतीयांची नजर 'टीम इंडिया'च्या कामगिरीकडे लागलेले असते.

यावेळचा वर्ल्ड कप होत आहे, तो जागतिक क्रिकेटची कर्मभूमीच नव्हे, तर आर्थिक केंद्र असलेल्या भारतात. भारतात चौथ्यांदा वर्ल्ड कपचे संयोजन होत आहे, तरी वन-डे क्रिकेट वर्ल्ड कप स्पर्धा भारतात पूर्णपणे होण्याची मात्र ही पहिलीच वेळ आहे. यापूर्वी भारतासह पाकिस्तान, श्रीलंका अगदी बांगलादेशही संयुक्त यजमान होते. आता ही स्पर्धा सुरू होईल. ती एकदा सुरु झाली की, भारतात बक्षिसाच्या रकमेवर कापून घेतल्या जाणाऱ्या कराचा परतावा, या स्पर्धेचे लांबलेले वेळापत्रक, त्यात झालेले बदल, पाकिस्तानने स्पर्धा बहिष्काराची दिलेली धमकी या सर्वांचा विसर पडणार आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये दक्षिण भारतात पाऊस जास्त असतोच, मात्र काही वर्षांपासून संपूर्ण देशातच आता या महिन्यात पाऊस होत असतो, याचाही विचार करायला कोणी तयार नसेल. आजपासून आनंद घेतला जाणार तो चौकार-षटकारांच्या आतषबाजीचा. समाधान-निराशा सगळे काही फिरत राहणार, ते भारतीय संघाच्या कामगिरीभोवती. भारतीय संघाच्या विजयाने दसऱ्याच्या श्रीखंडाची गोडी वाढणार, फटाक्यांची आतषबाजी सुखावणार, अन्यथा काय होईल ते सांगायलाच नको.

वर्ल्ड कप कोण जिंकणार, हा प्रश्न विचारण्यात फारसा अर्थ नसतो. भारताचा अंतीम सामना कोणासोबत व्हावा, याबाबत तर अनेकांचे एकच मत असते. २०११ (भारत), २०१५ (ऑस्ट्रेलिया) आणि २०१९ (इंग्लंड) या स्पर्धांत यजमानांनी वर्ल्ड कप उंचावला होता. हाच सिससिला कायम राखून यावेळी भारत ही स्पर्धा जिंकणार, असा विश्वास अनेकांना आहे. खरे सांगायचे तर अवघे क्रिकेट जगत लाईट्स... कॅमेरा... ॲक्शनसाठी तयार आहे. आजपासून चौकार, षटकारांची आतषबाजी, त्यासाठी केले जाणारे प्रयोग याची चर्चा होणार. अनेक मोबाइल, लॅपटॉप, टीव्ही स्क्रीनवर केवळ वर्ल्ड कप दिसणार. वर्ल्ड कप कालावधीत घरात रिमोटसाठी वाद होत नाहीत, कारण सर्व घरच क्रिकेटमय झालेले असते. तर व्यावसायिक पातळीवर वर्ल्ड कप हक्कासाठी अब्जावधी रुपये मोजलेल्यांसाठी हा दीड महिना त्यातील प्रत्येक पैसा वसूल करण्याचा असेल.

या वेळचा वर्ल्ड कप २०११ पेक्षा भिन्न आहे. त्या वेळी सचिन तेंडुलकरची कारकीर्द अंतिम टप्प्यात होती. त्याच्या अतुलनीय कारकिर्दीस भारतीय क्रिकेट संघ वर्ल्ड विजयाची भेट देणार का, या स्पर्धेत सचिन शंभरावे शतक करणार का, अशा चर्चा तेंव्हा होत्या. २०११ च्या वर्ल्ड कप विजेत्या संघात असलेला विराट कोहली आणि त्या स्पर्धेसाठी भारतीय संघातील निवड हुकल्याची हुरहूर अद्याप असलेला रोहित शर्मा यांची बहुधा ही अखेरची वर्ल्ड कप वन-डे स्पर्धा असेल. अर्थात या दोघांप्रमाणेच ऐनवेळी संघात आलेला रविचंद्रन अश्विनही यापुढील वर्ल्ड कपमध्ये खेळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे वैयक्तिक कामगिरीपेक्षा या वेळी जास्त चर्चा संघाच्या कामगिरीची असेल. भारतीयांनी वर्ल्ड कप विजेतेपदाचा एका तपाचा दुष्काळ संपवावा, अशी सर्वांचीच इच्छा आहे. गतविजेते इंग्लंड, गतस्पर्धेत भारतास उपांत्य फेरीत पराभूत केलेले न्यूझीलंड, गेल्या सहापैकी चार स्पर्धा जिंकलेले ऑस्ट्रेलिया, कायम धोकादायक असणारी; पण महत्त्वाच्या वेळी नांगी टाकणारी दक्षिण आफ्रिका, कोणत्याही परिस्थितीत काहीही करण्याची क्षमता असलेले पाकिस्तान, आशिया वन-डे स्पर्धेत धक्का देणारे श्रीलंका यांच्यात भारताची गणिते बिघडवण्याची क्षमता आहे. पहिल्या दोन्ही स्पर्धा जिंकलेल्या वेस्ट इंडिजविना ही स्पर्धा रंगणार आहे. नऊ साखळी लढती खेळण्याचे आव्हान असताना बांगलादेश आणि अफगाणिस्तान हे दुय्यम संघ कधीही अचानक धोकादायक ठरू शकतात. 'आयसीसी'साठी हा वर्ल्ड कप खूप मोलाचा आहे. मात्र क्रिकेट जगतात वन-डेचे महत्त्व कमी होत असून व्यावसायिक लीग वाढत आहेत. अनेक देशातील खेळाडू या लीगना पसंती देत आहेत. कसोटीची पारंपरिकता आणि टी-२० चा थरार या दोघांत आपले अस्तित्व राखण्यासाठी वन-डे क्रिकेट संघर्ष करीत आहे. या परिस्थितीत स्पर्धेस भारतीयांकडून मिळणारा मोठ्या प्रमाणावरील प्रतिसाद हा वन-डे क्रिकेटसाठी एक प्रकारची संजीवनी देणाराच ठरेल, यात शंका नाही.

# सामाजिक परिवर्तनासाठी उद्योजकतेला प्रोत्साहन

सामाजिक परिवर्तनासाठी एक शक्तिशाली माध्यम म्हणून उद्योजकतेची ओळख निर्माण होण्याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. उद्योजकता केवळ आर्थिक मूल्य निर्मितीच करत नाही, तर लोकांना त्यांचे अधिकार वापरण्यास आणि पारंपरिक नियमांच्या जोखडाबाहेर पडून व्यवहार करायला सक्षम बनवते. स्टार्ट-अप इंडिया, स्टँड-अप इंडिया यांसारख्या विविध उपक्रमांचा लाभ उठवता येण्याच्या दृष्टिकोनातून, सरकारने उपेक्षित आणि असुरक्षित वर्गांमधील उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी सक्रिय पावले उचलली आहेत. कुणीही संधीपासून वंचित राहणार नाही अशा आणि सर्व नागरिकांना त्यांची पार्श्वभूमी किंवा सामाजिक स्थिती यांचा विचार न करता समान संधी देऊ करणाऱ्या सर्वसमावेशक वृद्धीचा दृष्टिकोन राबवण्याचा हा प्रयत्न आहे. धोरणात्मक उपक्रम आणि नवोन्मेषी कार्यक्रमांद्वारे, उपेक्षित घटकांना सबल करणे आणि त्यांच्या क्षमतेला वाव देत तिचा योग्य उपयोग करून घेणे आणि अशा प्रकारे राष्ट्राचा सर्वसमावेशक विकास साधणे हा यामागील उद्देश आहे.

सवलतीच्या दरात वित्तपुरवठा करून अनुसूचित जाती प्रवर्गातील उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी, केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने २०१५ मध्ये, व्हेंच्युअर कॅपिटल फंड, या उपक्रम राबवण्यासाठीच्या भांडवली निधीची स्थापना केली. सध्या सुमारे ७२६ कोटी रुपयांएवढा कॉर्पस म्हणजे गुंतवणूक केलेले एकूण भांडवल असलेला हा निधी, सर्व उद्योगांमधील हरित-क्षेत्र आणि विस्तारीकरण प्रकल्पांसाठी, १० लाख रुपयांपासून १५ कोटी रुपयांपर्यंत अर्थसहाय देऊ करतो. या आर्थिक सहाय्याने पारंपरिक निधी उपलब्ध होऊ शकत नसलेल्या उभरत्या उद्योजकांसाठी, हे आर्थिक पाठबळ जीवनरेखा ठरले आहे. या फंडातील सर्वात उल्लेखनीय बाबींपैकी एक बाब म्हणजे वार्षिक ४% सवलतीचा व्याज दर. आता महिला उद्योजक आणि अनुसूचित जाती प्रवर्गातील दिव्यांग उद्योजकांसाठी ३.७५% पर्यंत कमी करण्यात आला आहे. व्याजदरातील या लक्षणीय कपातीमुळे उपेक्षित वर्गातील उद्योजकांना, अधिक प्रस्थापित वर्गातील त्यांच्या समकक्ष उद्योजकांच्या तुल्यबळ कामगिरी बजावणे शक्य होत आहे.

आंबेडकर सोशल इनोव्हेशन इनक्युबेशन मिशन (-डखखच्), हा सामाजिक नवोन्मेष पोषक उपक्रम हे सामाजिक परिवर्तनातील आणखी एक महत्त्वाचे पाऊल आहे. व्हेंच्युअर कॅपिटल उपक्रमाचा एक भाग म्हणून, अनुसूचित जाती प्रवर्गातील युवावर्गाच्या नवकल्पनांचा विकास आणि प्रसार करण्यासाठी २०२० मध्ये -डखखचची सुरुवात झाली, ३० लाख रुपयांपर्यंतच्या निधीपुरवठ्याद्वारे. -डखखच् ने अनुसूचित जातीचे विद्यार्थी आणि संशोधकांनी सुरू केलेल्या तंत्रज्ञानाभिमुख



प्रकल्पांना आणि स्टार्ट-अप्सना (नवं उद्योग) पाठबळ पुरवले आहे. या उपक्रमामुळे उद्योजकतेवर असलेल्या सरकारच्या एकंदर प्रभावाला आणखी एक गतिमान आणि नावीन्यपूर्ण पैलू लाभला आहे.

२० राज्यांमधील अनुसूचित जाती प्रवर्गातील उद्योजकांच्या मालकीच्या २०० उद्योगांना पाठबळ पुरवण्यासाठी ४८३ कोटी मंजूर करत, या उपक्रमांनी मोठा परिणाम साधला आहे.विविध क्षेत्रं व्यापलेले हे उपक्रम, प्रादेशिक विकास आणि राष्ट्र उभारणीच्या उदात्त कार्यात योगदान देत आहेत. शिवाय, पहिल्या फळीतील अनुसूचित जाती प्रवर्गातील उद्योजकांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन प्रदान करण्यासाठी, रूश-ाशर्पीी.ळप या डिजिटल संकेतस्थळाची (पोर्टल) स्थापना करण्यात आली आहे. यशस्वी उद्योजक बनण्यासाठी या पोर्टलच्या माध्यमातून, मार्गदर्शनपर सत्र आयोजित केली जात असतात.

इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गातील उद्योजकांमध्ये असलेली प्रचंड क्षमता ओळखून सरकारने २०१९ मध्ये या प्रवर्गासाठीदेखील व्हेंच्युअर कॅपिटल फंडाची स्थापना केली. सध्या १४३ कोटी रुपये कॉर्पस असलेला हा निधी, मागासवर्गीय उद्योजकांना सवलतीच्या दराने वित्तपुरवठा करत, सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योग (चडचए) क्षेत्रातील त्यांचा सक्रिय सहभाग वाढीस लावतो. सर्व उद्योगांमधील हरित-क्षेत्र आणि विस्तारीकरण प्रकल्पांसाठी, २० लाख रुपयांपासून ते १५ कोटी रुपयांपर्यंतचा निधी देऊ करून, आम्ही आर्थिक सर्वसमावेशकता वाढवत आहोत.

उत्पादन, सेवा आणि कृषी-संबंधित उद्योगांसह विविध क्षेत्रांतील ओबीसी उद्योजकांच्या मालकीच्या २९ कंपन्यांना, या फंडातून १०६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या आर्थिक पाठबळामुळे ओबीसी समाजाचा विकास आणि सर्वसमावेशकतेला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सिल्व्हर इकॉनॉमी (ज्येष्ठ नागरिकांसाठीची अर्थव्यवस्था म्हणजे ज्येष्ठांसाठी राबवले जाणारे आर्थिक उपक्रम) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी आणि स्वास्थ्यपूर्ण आयुष्यासाठी २०२१ मध्ये अटल वयो अभ्युदय योजना (-तत-ध) अंतर्गत ड-ऋए (सीनियर एजिंग ग्रोथ इंजिन) उपक्रम सुरू करण्यात आला. सध्या कॉर्पस २१.५० कोटी रुपये असलेला आणि १०६ कोटी रुपये अपेक्षित असलेला ड-ऋए व्हेंच्युअर फंड, वृद्धांसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम देऊ करणारे स्टार्ट-अप उभारायला चालना देत या कार्यपरिघातील उद्योजकता वाढीस लावतो. या उपक्रमांमुळे उपेक्षित घटकांच्या उद्योगक्षमतेची सर्वांना ओळख पटून या उपेक्षित घटकांना आपापले भवितव्य घडवण्याची जबाबदारी पेलण्यास सक्षम केले आहे. व्हेंच्युअर कॅपिटल फंडांद्वारे आर्थिक मदतीच्या तरतुदीमुळे, अर्थव्यवस्थेत ७०० कोटींपेक्षा जास्त मूल्याची मालमत्ता निर्माण झाली आहे. यामुळे ३ हजारांहून अधिक जणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

उपेक्षित आणि असुरक्षित समाज घटकांतील ४०० हून अधिक उद्योजकांनी त्यांच्या उद्योजकीय आकांक्षांची यशस्वी पूर्तता केली आहे. हे उद्योजक आता मेक इन इंडिया उपक्रमात सक्रियपणे योगदान देत, भारताची आर्थिक भरभराट आणि सुबत्ता वाढवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. सामाजिक सक्षमीकरण आणि राष्ट्र उभारणीच्या कामाला गती देणारा आघाडीचा घटक म्हणून उद्योजकतेला चालना देणे आणि उपेक्षित सामाजिक घटकांचे सक्षमीकरण करणे, याबाबत असलेली आपली वचनबद्धता, केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय ठामपणे जपत आहे. सर्व नागरिकांना, त्यांची पार्श्वभूमी किंवा सामाजिक स्थिती कशीही असली तरी त्या पलीकडे जाऊन सरकार, अनुसूचित जाती आणि मागासवर्गीयांसाठी असलेल्या व्हेंच्युअर कॅपिटल फंड, तसेच ड-ऋए व्हेच्युअर फंड यांसारख्या धोरणात्मक उपक्रमांद्वारे, सातत्याने समान संधी देऊ करत आहे. सर्वसमावेशक प्रगतीचा संकल्प केवळ एक स्वप्नच न राहता, परिवर्तनात्मक उपक्रमांच्या माध्यमातून वास्तवात साकारण्यात आला आहे. हे परिवर्तनात्मक उपक्रम, लोकांचे सक्षमीकरण, नवोन्मेषाला चालना आणि राष्ट्राची सर्वंकष विकासाच्या दिशेने वाटचाल घडवून आणत आहेत. अधिक सर्वसमावेशक आणि समृद्ध भारत निर्माण करण्यासाठी, अशा प्रयत्नांमधून फलदायी निष्पत्ती होत राहील. त्याचप्रमाणे हे प्रयत्न, प्रत्येक भारतीय नागरिकाच्या क्षमतेला वाव देऊन एकसंध आणि प्रागतिक भारत घडवण्याच्या आपल्या एकत्रित संकल्पपूर्तीच्या जवळ आपल्याला घेऊन जातील.

**- सौरभ गर्ग**
**(लेखक केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाचे सचिव आहेत)**

# महाराष्ट्राची आरोग्य सेवा कोलमडली


नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर शासकीय रुग्णालयातील रूग्णांच्या मृत्यूची घटना अंगावर शहारे येणारी आहे.राज्यातील शासकीय रुग्णालयाची खरी अवस्था काय आहे ही बाब राज्याच्या १३ कोटी जनतेला चांगल्याच प्रकारे ग्यात आहे.परंतु आता महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालये मृत्यूचे माहेरघर बनले की काय असे वाटत आहे.केंद्र सरकार व राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात आरोग्य सुविधांचा ढींढोरा पीटला आणि सर्वांना सरकारमार्फत चांगल्याप्रकारे आरोग्य सुविधा उपलब्ध करण्यात येईल असेही सांगितले.परंतु आज देशाच्या १४० कोटी जनतेच्या डोळ्यांसमोर नांदेड येथील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आणि छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात गेल्या तीन दिवसांपासून मृत्यूचा थैमान सुरू आहे ही अत्यंत चिंताजनक व गंभीर बाब आहे.ऐकीकडे बिच्चारे रूग्ण दगावत आहे आणि दुसरीकडे राजकीय पुढारी राजकारण करण्यात मग्न असल्याचे दिसून येते. शासकीय रूग्णांलयात सरकारने योग्य सुविधा प्रदान केल्या असत्या तर राज्यात खाजगी रुग्णालयांचा बाजार आणि व्यापार लागला नसता.गोरगरीबांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने शासकीय रुग्णालयात धाव घेतात.परंतु आता नांदेड आणि छत्रपती संभाजीनगरच्या शासकीय रुग्णालयावरून असे लक्षात येते की हे रूग्णांलय नसुन मृत्यू खाणा आहे की काय असे सर्वसामान्यांना वाटत आहे.अजुनही नांदेडच्या डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात मृत्यूचे सत्र थांबता थांबेनासे झाले आहे गेल्या ३ दिवसांत तब्बल २२ बालकांसह ४८ मृत्यू व २५ पेक्षा जास्त बालके अद्यापही अत्यवस्थ आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.तर दुसरीकडे छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात २४ तासांत तब्बल १८ रूग्णांचा मृत्यू झाला.या संपूर्ण बाबी सरकार मार्फत रूग्णांना मिळणाऱ्या अपुऱ्या सोईसुविधांमुळे निर्माण झाल्याचे सांगितले जाते.सरकार पाच लाखांपर्यंत उपचार मोफत मिळणार असे सांगत असतांनाच, प्रत्यक्षात शासकीय रुग्णालयात औषधांच्या अभावामुळे व तुटवड्यामुळे रूग्ण दगावतात आहे हे सरकारला का दिसत नाही?या संपूर्ण घटनांवरून असे दिसून येते की सरकारच्या सुविधा फक्त कागदावरच आहे की काय असे वाटत आहे.त्याचे प्रायचीत्य सर्वसामान्यांना व गरीबांना भोगावे लागत आहे. कुठे गेली शासकीय यंत्रणा, राज्यात रूग्णांसाठी अनेक योजना मग सरकारी रूग्णांलयात मृत्यूचे तांडव का?या संपूर्ण बाबींचा सरकारने गांभीर्याने विचार करून राज्यातील संपूर्ण शासकीय रूग्णालयांना अत्याधुनिक सुविधा पुर्ववत केल्या पाहिजेत जेणे करून रूग्णांचे प्राण वाचेल व गोरगरीब रुग्णांना खासगी रुग्णालयात जाण्याची वेळ येवू नये अशा पध्दतीचे कार्य सरकारने युध्दपातळीवर करायला हवे. राज्यात नांदेडच्या डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय किंवा छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात ही पहिलीच घटना नसुन राज्यातील अनेक शासकीय रुग्णालयात प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे व गैरसोयीमुळे अनेक रूग्ण दगावले आहेत.या संपूर्ण घटनांची सरकारने गांभीर्याने दखल घेऊन ताबडतोब शासकीय रुग्णालयांना रूग्णांच्या दृष्टीकोनातु योग्य पावले उचलुन संपूर्ण सुविधां रूग्णांपर्यंत कशा पोहचविता येईल या उद्देशाने पावले उचलली पाहिजेत. आता शासकीय रुग्णालयाच्या बाबतीत बघ्याची भूमिका नकोच किंवा मला पहा आणि फुले वाहाअशी भूमिका नको.कारण प्रत्येकांचे प्राण मोलाचे असतात.कोणाचे प्राण जर चुकांमुळे जात असेल तर ही अत्यंत गंभीर आणि जिव्हाळी लागणारी बाब आहे आणि आज जे आपण शासकीय रुग्णालयातील मृत्यूचे तांडव पाहत आहे ते प्रशासनाच्या व सरकारच्या चुकांमुळे निर्माण झालेले मृत्यू तांडव आहे.



रमेश लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.९९२१६९०७७९

नागपूर शहरातील मेडिकल आणि मेयो या दोन शासकीय रुग्णालयांमध्ये ७२ तासांत ६३ रूग्णांचा मृत्यू झाला असल्याचे सांगितले जाते. यातील ४३ मृत्यू मेडिकलमध्ये तर २० मृत्यू मेयोमध्ये झाले असल्याची माहिती समोर आली आहे.परंतु यात खाजगी रुग्णालयातुन मेडिकलमध्ये रेफर केलेल्या ३४ रूग्णांचा मृत्यूमध्ये समावेश आहे.त्यामुळे सरकारने आता खाजगी रुग्णालयांवर सुध्दा कठोर कारवाई करून त्यांच्या मुसक्या आवळने गरजेचे आहे.कारण सध्याच्या परिस्थितीत खाजगी रुग्णालयांची मनमानी सुरू असुन रूग्णांजवळुन मोठ्या प्रमाणात अवाढव्य फी आकारली जाते.

## शब्दकोडे-१९७



**आडवे शब्द**
१. हातचलाखीचे खेळ करणारा ३. गर्द रंगाचे विशेषन '--- निळे, --- निळे, जलद भरूनी आले' (बा.भ.बोरकर) ६. विल्हेवाट ९. आंब्याचा असल्यास मिष्टान्न, तंबाखूचा असल्यास घातक ११. उपाययोजनेपेक्षा ही महत्त्वाची १३. प्रत्येकी पावलाला, हरघडी १४. सीतेचे श्वशुर १७. अचानक, तात्काळ १८. तुरूंग २१. शुष्कता २४. अनुमती २६. माझे २८. क्रिकेटजगतासाठी संकट ठरलेला जुगाराचा प्रकार २९. तमाशातील कलावंत ३०. दुसऱ्यावर उपकार ३१. लायब्ररीला मराठी शब्द ३४. युद्ध ३६. टिंगल, खिल्ली ३८. विरुद्ध, उलट ४१. स्थिती, अवस्था ४२. हालचाल ४४. रात्र ४५. पळून गेलेला ४६. न वापरलेली, नवी ४७. हृदय ४८. कबूतर ४९. घर ५१. यावरील रेषा बघून भविष्य सांगतात ५३. मृत्यूदेवता ५५. चांगल्या कैरीची फोड अशी असते ५८. अडवणूक करणे ६०. चॅनेलवाल्यांसाठी ही पक्की असण्यापेक्षा सनसनाटी असणे महत्त्वाचे! ६२. ओलसर हवा ६४. उद्याच्या नंतरचा दिवस ६६. जेवणासाठी केळीचे, खाण्यासाठी मघई ६८. मंत्रीमंडळ, शासन ६९. नुकतेच जन्माला आलेले ७१. चकचकीत, स्वच्छ ७३. कलावंत ७५. अस्वल ७६. शाहिरी चर्मवाद्य ७७. ढीग ७८. नमस्कार ७९. दुबळा, गरीब

**उभे शब्द**
१. गणपतीचे आवडते लाल फूल २. पारख करणाऱ्यांचे कंदमूळ! ३. फाकडा, रगेल ४. भीती ५. कमतरता ७. सोन्या-चांदीची बाजारपेठ ८. तंबाखूचे शिंका आणणारे चूर्ण ९. नववधूने ओलांडून येण्याचे उंबरठ्यावरील पात्र १०. खटला दाखल करणारा १२. हिंदीत पाठीचा कणा १५. अध्यात्माच्या भाषते ही तर आत्म्याची खोळ १६. दमणूक (हिंदी) १९. नाचणी २०. तल्लीन, मग्न २२. नाना क्लृप्त्या लढवणारा, हिकमती २३. बित्तंबातमी २४. सुटकेचा मार्ग, चोरवाट २५. लालसा, इच्छा २७. चामखीळ २८. पातळसर ३०. पंख ३२. जिभेला झोंबणारे ३३. बारीकसारीक ३५. अभिप्राय ३७. आजच्या आधीचा दिवस ३९. मात खाणे, हार ४०. मर्यादा ४१. हाती गदा घेतलेला ४३. आराखडा, हा भौगोलिकच असतो असे नाही ४५. साडीबरोबरचे वस्त्र ५०. इलेक्ट्रॉनिक यंत्रांमुळे निवडणुकीतून बाद झालेले साधन ५२. उदरभरणामुळे पोटाला लागलेली रग ५४. यज्ञ, होमहवन ५६. अनेकांकडून कर्ज घेतलेला ५७. दुसऱ्यासाठी खिशाला बसलेली चाट ५९. आपला नसलेला ६१. आळशी ६३. पत्र ६४. स्वयंपाकातील एक क्रिया ६५. यात्रा करणारा ६७. नट्टापट्टा ६८. मैत्रिण ६९. मऊ ७०. 'उगाच कशाला' असा त्रास ७२. फोडामधील द्रव ७४. कर्ण

## शब्दकोडे १९६ चे उत्तर


**आडवे उत्तर**
१.अवकाळी ३.मानधन ७.खटला ९.अवस १०.रिकाम टेकडा १३.रजतम १५.सुमन १६.फोल १७.वाणी १८.रावण १९.माड २०.वार्ता २१.तलठी २३.हातोहात २४.जहर २५.पालट २६.जामात २८.अंतर २९.लवा ३०.पागा ३१.चरस ३३.पाक ३५.गो ३६.करवत ३८.फलाट ४०.लवाजमा ४१अ.चळत ४३.खीर ४४.तहहयात ४७.वल्गना ४८.टक ५०.थवा ५१.वनसरणी ५४.लहानसहान ५६.चराचर ५८.विमा ५९.भान ६१.रजनी ६२.आकलन ६३.अडीनडीला ६५.रावस ६६.वमन ६८.तमासगीर ६९.कणीदार ७०.कमलाकर ७२.टर ७३.टणत्कार ७४.तोल ७५.वीट

**उभे उत्तर**
१.अनारसा २.काबूत ३.मावळण ४.नस ५.नरिमन हाऊस ६.फाटे फोडणे ७.खडा ८.लावणी ११.कान १२.कल १४.मराठी १७.वार्ताहर २०.वाजतगाजत २१.तलवार २२.लाट २३.हातचलाखी २५.पालक २६.जागा २७.कृपा ३०.पाताळ ३२.रटरट ३४.कलह ३७.वचनावचनी ३९.खंत ४१.वाया ४२.तडस ४५.हनन ४६.पावा ४७.वनचर ४९.कलमा ५२.नर ५३.रसकस ५५.हातोडी ५७.राजकुमार ५८.विनवणी ६०.नरवर ६२.आवरण ६३.अनार ६४.लावालावी ६५.रागीट ६७.मदार ६८.तट ६९.कर ७०.कल ७१.कट

# दिव्य संगीत

-संत राजिंदर सिंह जी महाराज

प्रभूची ज्योती व आवाज अंतरीक दिव्य मंडलांचा राग आहे, दिव्य अमृत आहे. हे ते संगीत आहे जे शाश्वत परमानंद देते. ज्यांनी हे संगीत ऐकले, ते या विषयी त्या लोकांना कसे सांगतील ज्यांनी केवळ भौतिक संगीत ऐकले आहे? एक सामान्य मनुष्य बहिऱ्या



लोकांना कसे समजावेल की आवाज कसा असतो? आपण केवळ एक अपूर्ण तुलना करु शकतो. हे दिव्य संगीत सदैव आपल्या अंतरी वाजत आहे. आपण त्या विषयी बहिरे आहोत कारण कोणीही आपणास कसे ऐकावे, हे शिकविले नाही. हे संगीत काय आहे? आपण कोणत्याही धर्माचे धर्मग्रंथ वाचले तर आपल्याला आंतरिक संगीताचे संदर्भ मिळतील. या आवाजाला बाइबल मध्ये 'ेव' (शब्द) म्हटले आहे. हिंदू धर्म ग्रंथामध्ये 'ज्योती आणि श्रुती' म्हटले आहे. पारसी ग्रंथांमध्ये 'सरोषा', मुस्लिम धर्म पुस्तकां मध्ये' कलमा', बौद्ध ग्रंथांमध्ये 'सोनोरस लाईट', शीख धर्म ग्रंथामध्ये 'नाम किंवा शब्द', तसेच थियोसोफी मतांमध्ये 'व्हॉईस ऑफ सायलेन्स' (नीरव शांततेचा आवाज) म्हटले आहे. प्रभूच्या संगीतामध्ये एक प्रकारचे चुंबकीय आकर्षण आहे. जे आपल्या आत्म्याला स्वतःकडे आकृष्ट करून घेते आणि आपल्या आत्म्याला आंतरिक अध्यात्मिक मंडलांमध्ये घेऊन जाते. हा आवाज आपणास अवर्णनीय आनंदाने विभोर करतो. हा आनंद या जगातील कोणत्याही आनंदापेक्षा सरस आहे.

विश्वविख्यात परम पूजनीय संत राजिंदर सिंह जी महाराज यांचे देवळाली,जिल्हा नाशिक येथे दिनांक १२ व १३ ऑक्टोबर २०२३ रोजी शुभ आगमन होत आहे. त्यानिमित्त दर्शन, सत्संग आणि नामदान कार्यक्रम कॅन्टोन्मेंट ग्राउंड,आनंद रोड, देवळाली येथे आयोजित केला आहे.

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# भाजप दिव्यांग विकास आघाडीतर्फे 'मेरी माटी, मेरा देश' अभियान





## बाळासाहेब घुगे यांच्या कार्याचे मान्यवरांनी केले कौतुक

**नाशिक । प्रतिनिधी**

भाजप दिव्यांग विकास आघाडीच्या वतीने 'मेरी माटी, मेरा देश' व 'घरं चलो अभियान' काल राबविण्यात आले. प्रभाग क्रमांक ३८ मध्ये भाजप दिव्यांग विकास आघाडीचे प्रदेशाध्यक्ष जयसिंगराव चव्हाण यांनी व्हील चेअरवरून स्वतः घरोघरी जात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आजपर्यंत केलेल्या कामाचे पत्रके वाटप करत संवाद साधला. यावेळी चव्हाण यांचे परिसरातील नागरिकांकडून उस्फुर्त स्वागत करण्यात आले.

यावेळी प्रभागातील सर्व महिलांनी 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमात प्रत्येक घरातून मुठभर माती देण्यात आली. दरम्यान जयसिंगराव चव्हाण यांचे घरोघरी स्वागत करत महिलांनी औक्षण केले. तत्पूर्वी भाजप दिव्यांग विकास आघाडीचे प्रदेशाध्यक्ष जयसिंगराव चव्हाण यांचे पाथर्डी फाटा येथे दिव्यांग विकास आघाडीचे बाळासाहेब घुगे यांनी स्वागत केले.

यावेळी कार्यक्रमाला आ. सीमा हिरे, भाजप शहर अध्यक्ष प्रशांत जाधव, दिव्यांग आघाडीचे संघटक मंत्री काकासाहेब दीक्षित, मारुती मुंडे, माजी नगरसेविका छाया देवांग, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष सोनाली ठाकरे, रेश्मी हिरे-बेडाळे, जान्हवी बिरारी, मंडल अध्यक्ष रवी पाटील, प्रविण मोरे, उत्तम पिंटू काळे, जिल्हा अध्यक्ष हेमकांत शिंदे, दिव्यांग आघाडीचे जिल्हाध्यक्ष गोटीराम सूर्यवंशी, शहर अध्यक्ष विनायक कस्तुरे, न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा यमुनाताई घुगे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना चव्हाण म्हणाले, दिव्यांग मंत्रालयासाठी आपल्या भारतीय जनता पार्टीने गेल्या वीस वर्षापासून प्रयत्न केल्याने त्याला अखेर यश आले. त्याचे श्रेय इतर पक्षाचे लोक घेत आहेत. आपण सर्वांनी वेळोवेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडे मागणी केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना आरक्षण दिले असल्याने सर्व भारतीय जनता पार्टी दिव्यांग पदाधिकाऱ्यांनी झटून कामाला लागावे, येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मोदी यांनाच पंतप्रधान होण्यासाठी पक्ष मजबूत करावा असे आवाहन केले. तसेच आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका निवडणुकीत दिव्यांग बांधवांना आरक्षण मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील असे आश्वासन दिले.

यावेळी आ. सीमा हिरे यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले, यमुना घुगे आणि बाळासाहेब घुगे हे पती-पत्नी जरी दिव्यांग असले तरी त्यांचे कार्य चांगल्या माणसाला लाजवेल असे आहे. यानंतर प्रशांत जाधव यांनी येणाऱ्या निवडणुकीत दिव्यांग बांधवांचा विचार केला जाईल असे आश्वासन दिले. यावेळी बाळासाहेब घुगे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी बाळु शेवाळे, विक्रम पठाण, घनश्याम अनभुले, सागर जैन, साहेबराव कांगणे, राहुल वाजे, पुष्पा वाजे, आरती खैरनार, नीता मिश्रा, विद्या जोशी, शारदा शर्मा, पुजा शेवाळे, सुचिता दुसाने, मंगल काळे, सुवर्ण दुसाने यांच्यासह परिसरातील दिव्याग बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन दिव्यांग बाळासाहेब घुगे यांनी केले होते. तर आभार रंगनाथ दरगुडे यांनी मानले.



# उबाठा शिवसेनेतर्फे नागरिकांमध्ये 'होऊ द्या चर्चा'

**इंदिरानगर । प्रतिनिधी**

इंदिरानगर परिसरात शिवसेनेतर्फे (उबाठा) केंद्र सरकारतर्फे करण्यात आलेली गॅस दरवाढ, रेल्वे, एअर इंडिया, बीएसएनएल, बीपीसीएल, एमटीएनएल, गेल,भेल, सर्व्हिसवर टॅक्स, कफन टॅक्स, शिवस्मारक, काळेधन, दाऊदला फरपटतआणू, गंगा स्वच्छ, स्मार्ट सिटी, महागाई, शेतकऱ्यांवर होणारा अन्याय, काश्मिरी पंडित यांच्यासह विविध विषयांवर थेट जनतेत जाऊन चर्चा घडवून आणण्यात आली.

इंदिरानगर, रथचक्र चौक, सिटीगार्डन जॉगिंग, ट्रॅक या ठिकाणी 'होऊ द्या चर्चा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास शिवसेनेचे मध्य नाशिकचे पदाधिकारी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी विधानसभा प्रमुख बाळासाहेब कोकणे, महानगर संघटक सचिन बांडे, रविंद्र जाधव, संदेश फुले आदीचे स्वागत संजय गायकर, ऋषी वर्मा, साबी सिंग प्रविण जाधव यानी केले. यावेळी सुनील जाधव, कैलास जाधव, वसीम शेख, अनिल जाधव प्रेमलता जुन्नरे, श्रद्धा दुसाने, गुड्डी रंगरेज, एकता खैरे, कीर्ती निरगुडे, शिल्पा चव्हाण, आदी या चर्चासत्रात सहभागी झाले होते.



# श्रमसेवा पुरस्काराने रामहरी संभेराव, सुभाष जगताप सन्मानित

**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या श्रमसेवा पुरस्काराने भाजपा ज्येष्ठ नेते रामहरी संभेराव आणि नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे योजनाप्रमुख सुभाष जगताप यांना नाशिक महापालिका व जिल्हा प्रशासनाच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

याबाबत माहिती अशी की, आ. सीमा हिरे यांच्या सातपूर आणि सिडको येथील जनसंपर्क कार्यालयातून केंद्र शासन तसेच राज्य सरकार व नाशिक महापालिका यांच्याकडील जीवनपयोगी योजना तळागाळातील गरजू लोकांपर्यंत रामहरी संभेराव, सुभाष जगताप यांनी यशस्वीपणे पोहोचवल्या. याची मनपा प्रशासन व जिल्हा प्रशासनाने दखल घेत नाशिक मनपा उपायुक्त प्रशांत पाटील यांनी रामहरी संभेराव, सुभाष जगताप यांना सन्मानित केले.

उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी पंचवटी विभागाचे विभागीय अधिकारी कैलास राबडिया, प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख अनिल भडांगे, सामाजिक कार्यकर्ते आत्माराम वाघमारे, जयश्री वाघ आदी उपस्थित होते.

# डॉ.वसंतराव पवार स्मृती पुरस्कार बीडच्या 'उचल' संस्थेला

## मान्यवरांच्या हस्ते आज वितरण

**नाशिक । प्रतिनिधी**

नीलवसंत मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर या सामाजिक संस्थेच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा कै. डॉ. वसंतराव पवार स्मृती पुरस्कार बीड येथील उचल फाउंडेशन या सामाजिक संस्थेला जाहीर झाला आहे. गंगापूर रोडवरील रावसाहेब थोरात सभागृहात आज शनिवार दि. ७ ऑक्टोबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत उचल संस्थेचे अध्यक्ष सचिन खेडकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. अशी माहिती निलवसंत फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्राची पवार यांनी दिली.

पंडित कॉलनी येथील लायन्स क्लबच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. प्राची पवार व पुरस्कार समितीच्या अध्यक्षा नीलिमाताई पवार यांनी माहिती दिली. डॉ. प्राची पवार यांनी सांगितले की, निलवसंत मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर ही सामाजिक संस्था कै. डॉ. वसंतराव पवार यांच्या प्रेरणेतून व मार्गदर्शनातून ३१ ऑगस्ट २००५ रोजी स्थापन झाली आहे. संस्था स्थापनेपासून प्रामुख्याने नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे.

प्रामुख्याने आरोग्य व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर, शिक्षण व उद्योजकता प्रशिक्षण शिबिरे, पर्यावरण, सार्वजनिक स्वच्छता, महिला सक्षमीकरण, शेतकरी मंडळांची स्थापना करणे, जलवसंत अभियान अंतर्गत ग्रामीण भागात फिल्टर प्लांटची द्वारे लोकांना शुद्ध पाणी उपलब्ध करून देणे, यासारखे उपक्रम राबित असते. संस्थेचे विश्वस्त व नाशिक जिल्ह्याचे समाजाभिमुख बहुआयामी व्यक्तिमत्व कै. डॉ. वसंतराव पवार यांच्या स्मृतीदिनानिमित्त संस्थेतर्फे डॉ. वसंतराव पवार स्मृती पुरस्कार सन २०१२ पासून प्रदान करण्यात येतो.

दरवर्षी या पुरस्काराने शिक्षण, वैद्यकीय, सामाजिक यापैकी एका क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना किंवा संस्थांना सन्मानित करण्यात येते, यावर्षीचा पुरस्कार सामाजिक क्षेत्रातील ऊसतोड कामगारांच्या बालकांसाठी काम करणाऱ्या बीड येथील उचल फाउंडेशन या सामाजिक संस्थेला प्रदान करण्यात येणार आहे.

पुरस्कार समितीच्या अध्यक्षा नीलिमाताई पवार यांच्या हस्ते खेडकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमास शकुंतला वाघ, सुरेशबाबा पाटील व बिपिनदादा कोल्हे उपस्थित राहणार आहेत. या पुरस्काराचे स्वरूप हे मानपत्र, सन्मानचिन्ह व रक्कम एक लाख रुपयांचा धनादेश आहे. या पत्रकार परिषदेस पुरस्कार समिती सदस्य विजय कोठारी, रवींद्र मणियार, रंजना पाटील, वसंत खैरनार आदी उपस्थित होते.




### 'उचल' कडून ३५ अनाथ मुलांचा सांभाळ

**उचल फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन खेडकर या अनाथ तरुणाने अत्यंत प्रतिकूल आणि हलाकीच्या परिस्थितीत ऊसतोड कामगार म्हणून काम करत असताना शिक्षण घेऊन आता तो सुमारे ३५ अनाथ आणि निराधार मुलांचा सांभाळ करत आहे. तसेच त्यांच्या शिक्षणासाठी सोयी सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याच्या या कार्याला सहकार्य म्हणून नीलवसंत संस्थेच्या वतीने त्यांना हा पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला.**

**- निलिमाताई पवार, अध्यक्षा, पुरस्कार समिती**

ॲड.डी.ए. झोडपे
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज नं. ११७०/२०२३**

१. कमल पौलाद सोनवणे उ.वय-५७, धंदा-घरकाम
२. सुनिल पौलाद सोनवणे उ.वय-४० धंदा-मजुरी
सर्व रा. इंदिरा नगर, स्टेडियम जवळ, वलवाडी ता. जि. धुळे ...**अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**कोणीही नाही**
१ पौलाद हरसिंग सोनवणे (मयत)
मृत्यू दिनांक (२३/०२/२०२१) ...**सा. वाला**

ज्या अर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो कनिष्ठ स्तर धुळे यांच्या न्यायालयात ३०/०९/२३ रोजी दि.कि. अर्ज नं. ११७०/२३ चा वारस दाखला (Legal Hier Certificate) रा. इंदिरा नगर, स्टेडियम जवळ, वलवाडी ता. जि. धुळे अर्जदार यांनी दि.बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम VIII(II) दि. बॉम्बे प्रमाणे कायदेशिर वारस ठरवून मिळण्याकरिता सदरचा अर्ज मे न्यायालयात दाखल केलेला आहे. त्या अर्थी मे न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविण्याकरीता पुढील चौकशी दिनांक २३ / ११ / २०२३ ही निश्ति केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. ९ वे सह दिवाणी न्यायाधीश सो, कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात दिनांक २३/११/२०२३ रोजी १०.३० वाजेचा सुमारास मे न्यायालयात दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही काहीही हरकत न आल्यास सदरच्या अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण : धुळे
दिनाक : ०४/१०/२०२३ आदेशावरुन

**कामगीरी कारकून**
**सह. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, धुळे**
(शिक्का)
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर धुळे**

# मविप्र रुग्णालयातील डॉक्टरांची कामगिरी : तीन लहान मुलांना मिळाले जीवदान

**नाशिक । प्रतिनिधी**

आडगाव येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय व मविप्र रुग्णालयातील कान- नाक -घसा व भूलशास्त्र विभागातील डॉक्टरांनी तीन लहान मुलांच्या घशात अडकलेल्या वस्तु बाहेर काढण्यासाठी तत्काळ शस्त्रक्रिया करत या तिन्ही मुलांना जीवदान दिले आहे.

आडगाव येथील डॉ.वसंतराव पवार मेडिकल कॉलेज व मविप्र रुग्णालय येथे नाक-कान व घसा विभागा अंतर्गत ही तीन लहान मुले उपचारासाठी दाखल झाली होती. कान-नाक- घसा विभागातील डॉक्टरांनी त्यांची तपासणी करत यात एक वर्षाच्या बाळाने तीन सेंटीमीटर आकाराचे गळ्यातील पदक तर दोन वर्षाच्या बाळाने चपटा बॅटरी सेल आणि चार वर्षाच्या बाळाने पाच रुपयाचे नाणे गिळले होते. त्यामुळे तीनही बालकांना श्वास घेण्यास त्रास होऊन अन्न गिळणे अवघड झाले होते. यावर कान-नाक-घसा विभाग प्रमुख व प्राध्यापक डॉ.श्रीया कुलकर्णी, सहयोगी प्राध्यापक डॉ.ऋषिका पटेल, डॉ. दिव्या बंगेरा व इतर तज्ञ डॉक्टर्स यांनी या बाळांची तपासणी करत निदान करत तिन्ही बाळांवर यशस्वी शस्त्रक्रिया केली.

पालकांनी मविप्र रुग्णालय व त्यांना घसा विभागातील डॉक्टरांना धन्यवाद दिले आहेत. मविप्र संस्थेचे सरचिटणीस ड. नितीन ठाकरे, सर्व पदाधिकारी व संचालक तसेच शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे, अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे यांनी डॉक्टरांच्या या कामगिरीचे कौतुक केले आहेत.

# लासलगाव येथे आयुष्यमान भव आरोग्य विषयक मोहीम

**लासलगाव ।** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभरात आयुष्यमान भव ही महत्वकांक्षी आरोग्य विषयक मोहीम दि १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर पर्यंत राबिविली जाणार आहे.या मोहिमेचा उद्देश हा गाव पटलीपर्यंत गुणवत्तापुर्वक आरोग्य सेवा व सुविधा पुरविणे व जनजागृती करणे हा आहे. त्या अनुषंगाने दिनांक ७ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत ग्रामीण रुग्णालय लासलगाव येथे जिल्हा वैद्यकीय महाविद्यालय येथील विविध तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध होणार आहे.

ॲड. योगिराज दिलीप सोनवणे, धुळे
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो व.स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज क्र.११८०/ २०२३**

१. जगन्नाथ शिवाजी पाटील
उ.व.-५०, धंदा मजुरी रा. चिंचवार, ता. जि. धुळे,
२. कविताबाई आनंदा हालोर उ.व.-२७, धंदा-घरकाम,
रा. मेन गल्ली, बेहेड, ता. साक्री, जि. धुळे.
३. सुभाष जगन्नाथ पाटील
उ.व.-२२, धंदा- हातमजुरी,
रा. चिंचवार, ता. जि. धुळे. ...**अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**कोणीही नाही** ... **सामनेवाला**
**आणि**
विमलबाई जगन्नाथ पाटील (मयत)
मृत्यु दि. ०१/०४/२०२१
मृत्यु ठिकाण : चिंचवार, ता.जि.धुळे. ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात विमलबाई जगन्नाथ पाटील (मयत) यांचे अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय तसेच इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसेच अर्जदार हे विमलबाई जगन्नाथ पाटील (मयत) यांचे कायदेशीर वारस असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि.०४/१०/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. २०/११/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही बाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं. ८ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण-धुळे
दिनांक :- ०५/१०/२०२३ आदेशावरुन

**कामगीरी कारकून**
**मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**
(शिक्का)
**अधिक्षक**
**मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

# कॉंग्रेसतर्फे महागाई, बेरोजगारी, महिला अत्याचार विरोधात सत्याग्रह मार्च

**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संध्या सव्वालाखे यांच्या सूचनेनुसार नाशिक ज़िल्हा महिला कॉंग्रेसच्या अध्यक्ष वंदना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली चुंचाळे परिसरात सत्याग्रह मार्चचे नियोजन करण्यात आले होते.

मोदी सरकारने केलेल्या अन्यायकारी गॅस, इंधन दरवाढ, मणिपूर येथील महिला अत्याचार विरोधात हा सत्याग्रह मार्च काढण्यात आला असल्याचे यावेळी कॉंग्रेसतर्फे सांगण्यात आले.




चुंचाळे परिसरात ग्रामीण भागातून आलेल्या सर्वसामान्य लोकांना महागाई, बेरोजगारी विरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा मिळावी आणि जनतेने सरकारला प्रश्न विचारण्यासाठी प्रवृत्त व्हावे यासाठी हा मार्च काढण्यात आला होता. सत्य आणि अहिंसा हे महात्मा गांधी यांचे विचार नवीन पिढीने अनुकरण करावे याकरिता सत्याग्रह मार्चचे आयोजन करण्यात आले होते.

महिला कॉंग्रेसतर्फे महात्मा गांधी यांचे फोटो हातात घेऊन सत्याग्रह मार्च काढण्यात आला. जनतेत महात्मा गांधी यांचे सत्य, अहिंसाचे विचार जनतेत रुजावे यासाठी हा मार्च महत्वाचा असल्याचे महिला अध्यक्ष वंदना पाटील यांनी सांगितले. माजी नगरसेविका आशा तडवी यांनी मणिपूर येथे झालेल्या महिलांवर अत्याचारा विरोधात महिलांनीं संघर्ष करावा असे आवाहन केले.

नाशिक शहर अध्यक्ष आकाश छाजेड यांनी 'गांधी आणि आजचा भारत' या विषयावर आपले मत व्यक्त केले. यावेळी ज्युली डिजुसा, सुमन महाले, कौशल्य बनकर, माया चुचोलकर, दर्शना सावंत, मनीषा गुरव, आश्विनी गुजर, संगीता जगताप, ब्लॉक अध्यक्ष विजय पाटील, मुन्ना ठाकूर, गौरव सोनार, इम्रान अन्सारी यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले होते.

न्यूज कॉलम

### सिसोदे महाविद्यालयातर्फे स्वच्छता मोहीम

धुळे । धुळे ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नरडाणा येथील (कै.) भाऊसाहेब एम. डी. सिसोदे महाविद्यालयातर्फे महात्मा गांधी जयंतीनिमित्त अभिवादनासह स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. महाविद्यालय परिसर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर, रेल्वे स्टेशन आदी ठिकाणी साफसफाई करण्यात आली. निर्माल्य व प्लॅस्टिक कचरा संकलित करण्यात आला. ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजीवकुमार सिसोदे, संजीवनी सिसोदे, सिद्धार्थ सिसोदे, पी. एस. गिरासे, वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपक्रमात सहभाग नोंदविला.

### विषसेवन केल्याने तरुणाचा मृत्यू

शिंदखेडा । तालुक्यातील चिमठाणे गावात विषारी औषध प्राशन केल्याने तरुणाचा मृत्यू झाला. मुकेश विठोबा कोळी असे मृत तरुणाचे नाव आहे. त्याने २८ सप्टेंबरला मध्यरात्रीच्या सुमारास काहीतरी विषारी औषध सेवन केले. त्याला जिल्हा रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरू असताना मृत्यू झाला.

# 'महाआयएसजीकॉन २०२३'मध्ये आजपासून; मंथन घडविले जाणार

## पोटाच्या विकार तज्ज्ञांचे दोन दिवसीय परिषदेत महत्वपूर्ण सहभाग

नाशिक । प्रतिनिधी

इंडियन सोसायटी ऑफ गॅस्ट्रॉलॉजी आणि नाशिक गॅस्ट्रॉलॉजी सोसायटी यांच्या वतीने 'महाआयएसजीकॉन' २०२३ चे आयोजन केले आहे. हे दोन दिवसीय 'जीआय समिट' येत्या शनिवार दि.७ आणि रविवारी दि.८ ऑक्टोबर रोजी पाथर्डी फाटा येथील हॉटेल रॅडिसन्स ब्ल्यू येथे पार पडणार आहे. परीषदेत पोटाच्या विकारांसंदर्भातील आजार व त्यावरील उपचार पद्धतीतील आधुनिक तंत्रज्ञान, इतर विविध विषयांवर मंथन घडविले जाईल. अशी माहिती परीषदेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन बोरसे, आयोजन समिती सचिव डॉ.हुसेन बोहरी यांनी पत्रकार परीषदेत दिली.

परीषदेत सहभागासाठी डॉक्टरांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. या पत्रकार परीषदेस खजिनदार डॉ.संदीप पाटील, सहखजिनदार डॉ.शरद देशमुख



**परिषदेमध्ये व्यापक स्वरुपात होणार चर्चा**

**जीवनशैलीतील बदलांमुळे उद्धवणारे पोटांचे विकार व त्यांच्यावरील उपचार, औषधोपचाराचे महत्त्व, शल्यचिकित्सकांची भूमिका तसेच उपचार प्रक्रियेत एंडोस्कोपिस्टच्या निदानाचे महत्त्व, रुग्णांमध्ये आजाराप्रमाणे आहारात करावयाचे बदल, शस्त्रक्रियेतील आधुनिक तंत्रज्ञान यांसह यकृताशी निगडीत व्याधी, यकृत प्रत्यारोपण (लिव्हर ट्रान्सप्लांट) नंतर संभाव्य गुंतागुंतींवरील उपचार अशा व्यापक स्वरुपातील विषयांवर परिषदेत मंथन घडविले जाणार आहे.**

यांच्यासह आयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.अधिक माहिती देतांना आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ.नितीन बोरसे म्हणाले, वैद्यकीय क्षेत्रात तंत्रज्ञानामुळे उपचारात आधुनिकता आली असून, यामुळे रुग्णांना दिलासा मिळतो आहे. नाशिकमध्ये दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध झाल्या असल्याने गुंतागुंतीच्या आजारांवर येथे यशस्वी उपचार केले जात आहेत. पोटाच्या विकारांवर उपचार करणार्या डॉक्टरांना एकत्रित आणत वैद्यकीय क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देतांना मंथन घडविण्याच्या उद्देशाने नाशिकमध्ये ही परिषद आयोजित केली आहे. परिषदेत पोटाशी निगडीत उद्धवणारे नवनवीन विकार आणि वेगवेगळ्या आजारांवरील आधुनिक उपचार पद्धती, संशोधन, शोधप्रबंधांचे सादरीकरण केले जातील.

आयोजन समितीचे सचिव डॉ.हुसैन बोहरी म्हणाले, परीषदेच्या पहिल्या दिवशी विविध विषयांवरील २७ सत्र आयोजित केले आहेत. यामध्ये काही समुह चर्चा (पॅनल डिस्कशन), सादरीकरण आणि परिसंवादांचा समावेश आहे. पहिल्या दिवशी सायंकाळी ७ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत औपचारिक उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. परिषदेच्या दुसर्या दिवशी १८ विषयांवर त्या-त्या विषयातील तज्ज्ञ उपस्थित राहून मार्गदर्शन करतील.

परीषदेच्या आयोजनासाठी आयोजन समितीचे सदस्य डॉ. अद्वय आहेर, डॉ.सोहम दोशी, डॉ.प्रतिभा पगार, डॉ.तुषार संकलेचा, डॉ.मंगेश मानगुळकर, डॉ.धवल चोकसी, डॉ.महेश पाटील, डॉ.गौरव बच्छाव, डॉ. सुदर्शन पाटील, डॉ.सचिन धांडे हे परीश्रम घेत आहेत.

# मिशन सर्वेदनाअंतर्गत आशाताई करणार दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण !



### मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता यांची माहिती

धुळे । प्रतिनिधी

मिशन संवेदना अंतर्गत जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण आशा वर्करच्या माध्यमातून करण्यात येणार असून दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता यांनी आज येथे दिली.

आज मिशन संवेदना अंतर्गत साक्री येथे दिव्यांग सर्वेक्षण प्रशिक्षण घेण्यात आले . या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी श्री अभिनव गोयल उपस्थीत होते. यावेळी प्रमूख मार्गदर्शक म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी समाज कल्याण अधिकारी श्री मनिष पवार, गट विकास अधिकारी श्री शशीकांत सोनवणे, गट शिक्षण अधिकारी राजेंद्र पगारे, महात्मा गांधी सेवा संघाचे कृष्णा शिरसाठ, सागर कान्हेकर आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री गुप्ता म्हणाले की, मिशन संवेदनांतर्गत दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण कार्यक्रम आशाताई मार्फत होणार आहे. आशाताई दिव्यांगस्नेही म्हणुन काम पाहणार आहे. मिशन संवेदना अंतर्गत दिव्यांग बालकांचा घरोघरी जाऊन सर्वेक्षण कार्यक्रम जिल्ह्यात राबविण्यात येणार असून यासाठी आशा ताईंना प्रशिक्षण देण्यात येत आहे. सदर प्रशिक्षण दिल्यानंतर आशाताई हे महात्मा गांधी सेवा संघ यांनी तयार केलेल्या मोबाईल प्लिकेशन द्वारे दिव्यांग बालकांचे सर्वेक्षण करणार असून त्या मार्फत उपलब्ध होणारा डाटा नुसार दिव्यांग बालकांना विविध शैक्षणिक व सरकारी योजनांचा लाभ मिळणार आहे.

मिशन संवेदनाअंतर्गत आशा वर्कर यांना दिव्यांग बालकांचा शोध घेण्यासाठी घरोघरी जावे लागणार असून यासाठी त्यांना मानधन देखील मिळणार आहे.

दिव्यांग सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत दिव्यांग सर्वेक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात जिल्ह्यात शिरपूर तालुक्यापासून करण्यात आली. मिशन संवेदनाचा उद्देश दिव्यांगाना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणने हा असल्याचे श्री गुप्ता यांनी यावेळी सांगितले.

# जयहिंद सोसायटीच्या चेअरमन पदी विजय पाटील तर व्हा. चेअरमन पदी चंद्रशेखर पाटील

धुळे । प्रतिनिधी

देवपूरातील जयहिंद सोसायटीच्या चेअरमन पदी विजय पितांबर पाटील यांची, तर व्हा. चेअरमन पदी पहिल्यांदाच भरघोस मतांनी निवडून आलेल्या इंजि. चंद्रशेखर पाटील यांची बिनविरोध निवड झाली.



निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अमोल एंडाईत,नागेश पुकळे, योगेश पाटील यांनी कामकाज सांभाळले. मावळते चेअरमन डॉ.अरुण साळुंखे यांच्यासह विजय बोरसे, ॲड राजन पाटील, भारती भामरे, अविनाश देवरे, प्रमोद पाटील, विश्वेश्वर देवरे, शरद बच्छाव, नीलेश पाटील, भूषण सावंत, डॉ. नितीन काकडे, मोहन मोरे हे संचालक हजर होते. जयहिंद सभासद पॅनलने झुलाल भिलाजीराव पाटील पॅनलचा धुव्वा उडविला. सत्तांतरासाठी ॲड. अभिजित पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पुढील बैठकीत सेक्रेटरी निवड होईल. चेअरमन व व्हा.चेअरमन पदाची बिनविरोध निवड झाल्यावर पदाधिकाऱ्यांनी फडाके फटाक्याची आतिषबाजीने मोठ्या उत्साहात जल्लोष साजरा केला.

### बेपत्ता तरुणाचा विहिरीत मृतदेह

धुळे । घरातून निघून गेलेला तरुण दोन दिवसांनी ग्रामपंचायतीच्या विहिरीत मृतावस्थेत आढळला. राकेश सोमनाथ सोनवणे असे त्याचे नाव आहे. तो २ ऑक्टोबरला रात्री साडेदहाच्या सुमारास घरात कोणाला काही न सांगता निघून गेला. कुटुंबियांनी त्याचा परिसरासह नातेवाईकांकडे शोध घेतला. मात्र, तो मिळून आला नाही. बुधवारी ४ ऑक्टोबरला सकाळी गावातील ग्रामपंचायतीच्या विहिरीत त्याचा मृतदेह आढळला. त्याला ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. साक्री पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

# भारत विकास परिषदेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी स्पर्धांचे आयोजन

धुळे । प्रतिनिधी

राष्ट्रीय स्तरावर सेवाभावी कार्यात देवगिरी प्रांत अंतर्गत कार्यरत असलेल्या भारत विकास परिषद धुळे शाखा यांच्यातर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी दोन अभिनव स्पर्धा नुकत्याच आयोजित करण्यात आल्या होत्या. माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी चेतना के स्वर आणि भारत को जानो या त्या दोन स्पर्धा होत .यामध्ये विविध शाळांनी उत्तम सहभाग नोंदवला. चेतना के स्वर व भारत को जानो या स्पर्धा नुकत्याच घेण्यात आल्या होत्या .त्यामध्ये कमलाबाई शंकरलाल शाळा विजयी झाली, दुसरे पारितोषिक





चितळे माध्यमिक विद्यालय व तिसरे गरुड प्री प्रायमरी व प्रायमरी स्कूल ही शाळा विजयी झाली . उत्तम सहभागाबद्दल महाजन हायस्कूल यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले यात सात संघ सहभागी झाले होते.

भारत को जानो ही सामान्य ज्ञानावर आधारित परीक्षा सर्व शाळातून घेण्यात आली. आधी लेखी, नंतर क्वीझ स्वरूपात ही स्पर्धा होती. उत्तम सहभाग नोंदवत सीनियर गटात केंद्रीय विद्यालय आणि जुनियर गटात गरुड प्रायमरी प्री प्रायमरी हायस्कूल शाळेने विजेतेपद पटकावले. समूहगन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रसिद्ध गायक प्रा डॉक्टर श्री शेखर रुद्र आणि ऑर्केस्ट्रा फेम गजेंद्र पाटील यांनी काम पाहिले .तसेच भारत को जा नो या स्पर्धेसाठी डॉक्टर श्री एन एम जोशी यांनी काम पाहिले तसेच श्री ललित कुलकर्णी यांनी त्यांना सहकार्य केले .या सर्व स्पर्धांचे नियोजन करण्यात भारत विकास परिषदेच्या मुख्य कार्यकर्त्या डॉक्टर सौ प्राची शुक्ल सौ वीणाताई गानू ,सौ वृषाली येवले यांचा सहभाग होता.तसेच भारत विकास परिषद धुळे शाखा अध्यक्ष श्री राजेंद्र जाखडी, सेक्रेटरी सह सेक्रेटरी यांनी मार्गदर्शन केले तसेच रायझिरो संस्था, बांधकाम व्यावसायिक योगीराज मराठे सर यांनी आर्थिक सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद देऊन दोन्ही स्पर्धा यशस्वी केल्या.

# 'झेडपी' तील रिक्त पदांसाठी ७ ते ११ ऑक्टोबरला परीक्षा

धुळे । प्रतिनिधी

जिल्हा परिषद, धुळेंतर्गत विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी ७ ते ११ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत तीन संगणकीय परीक्षा केंद्रांवर ऑनलाइन परीक्षा होईल. अशी माहिती धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये दिली.

धुळे जिल्हा परिषदेतील रिक्त पदे भरती जाहिरात क्रमांक ०१/२०२३ अंतर्गत विविध संवर्गातील विषयांची संगणकीय परीक्षा आयबीपीएस कंपनीमार्फत धुळे शहरातील तीन संगणकीय परीक्षा केंद्रांवर ऑनलाइन होणार आहे. परीक्षेचे सुधारित वेळापत्रक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://dhule.nic.in या संकेतस्थळावर तसेच धुळे जिल्हा परिषदेच्या https://dhulezp.mahapanchayat.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. याची सर्व परीक्षार्थींनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आले आहे.

धुळे जिल्हा परिषदेतील रिक्त पदे भरती जाहिरात क्रमांक ०१/२०२३ अंतर्गत विविध संवर्गातील विषयांची संगणकीय परीक्षा आयबीपीएस कंपनीमार्फत धुळे शहरातील तीन संगणकीय परीक्षा केंद्रांवर ऑनलाइन होणार आहे. परीक्षेचे सुधारित वेळापत्रक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://dhule.nic.in या संकेतस्थळावर तसेच धुळे जिल्हा परिषदेच्या https://dhulezp.mahapanchayat.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. याची सर्व परीक्षार्थींनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आले आहे.

# पत्रकार भवनात प्रकाश शिरसाठ यांचा वाढदिवस साजरा



**स्वाभिमानी न्युज चॅनलचे संपादक तथा धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे विद्यमान कार्यकारिणी सदस्य, अभ्यासु पत्रकार, स्पष्टवक्ते व्यक्तिमत्व प्रकाशनाना शिरसाठ यांचा वाढदिवस पत्रकार भवन येथे छोटेखानी स्वरुपात साजरा करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रविंद्र इंगळे, विद्यमान उपाध्यक्ष मनोज गर्दे, सचिव सचिन बागुल, कोषाध्यक्ष अतुल पाटील, प्रांतिक प्रतिनिधी तुषार बाफना, कार्यकारिणी सदस्य दीपक पाटील, कार्यालयीन अधीक्षक सुभाष वाघ, दै. लक्ष महाराष्ट्रचे मुख्य उपसंपादक पुरुषोत्तम पाटील, दै. आधुनिक केसरीचे जिल्हा प्रतिनिधि पत्रकार आकाश उर्फ सनी सोनवणे, ए वन न्युजचे उपसंपादक दीपक शिंदे, दैनिक सकाळ तथा सांजदैनिक खान्देश मैदानचे प्रेस फोटोग्राफर गोरख गर्दे, चंद्रमणी वाघ इत्यादी मान्यवरांनी प्रकाश शिरसाठ यांना वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करुन शुभेच्छा दिल्या.**

# विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद महाविद्यालयात वाङ्मय मंडळाचे उद्घाटन





साक्री । प्रतिनिधी

विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वाङ्मय मंडळाचे उद्घाटन अहिराणी कवी श्री बापू सोनवणे यांच्या हस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे होते. प्रसंगी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ अनंत पाटील,मराठी विभाग प्रमुख डॉ प्रकाश साळुंके, डॉ सचिन गोवर्धने,पर्यवेक्षक प्रा डी पी पाटील, डॉ भूषण अहिरराव, डॉ धनंजय पाटील, डॉ चंद्रकांत कढरे उपस्थित होते. वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी अहिराणी कवी श्री बापू सोनवणे यांनी आपल्या कवितांचे सादरीकरण केले. समाजातील विविध प्रश्नांवर त्यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून भाष्य केले. स्वच्छतेचे महत्व, स्त्री भ्रूण हत्या, शेतकरी आत्महत्या, हागणदारी मुक्त गाव, आई-वडिलांची सेवा इत्यादी विषयांवर त्यांनी आपल्या मायबोलीतून अहिराणी गीतांचे सादरीकरण केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे यांनी आपले प्रश्न आपल्या अहिराणी भाषेतून मांडण्याची पद्धत प्रभावी असून विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून ते अधिक उपयोगी असल्याचे मत व्यक्त केले. औपचारिक दृष्टिकोनातून अशिक्षित असलेल्या कवी बापू सोनवणे यांनी समाजाच्या प्रश्नांची योग्य माहिती आपल्या कवितेच्या माध्यमातून दिली असे देखील मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन मराठी विभाग प्रमुख तथा वाङ्मय मंडळाचे सचिव डॉ प्रकाश साळुंके त्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री शरद बोरसे, श्री प्रशांत बोरसे, श्री सुधाकर देवरे यांनी परिश्रम घेतले.सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी बांधव व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# पप्पा आमची शाळा वाचवा; वाडी वस्ती व तांड्यावरी पटसंख्या कमी असलेल्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांची हाक

### २० पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद होणार..

वरूळ । प्रतिनिधी

दुर्गम भागातील अर्थात वाडी, वस्ती व तांड्यावरील वीस पेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या जिल्हा परिषद शाळा बंद करून त्यांच्या ऐवजी समुह शाळा सुरू करण्याच्या हालचाली शासनाने सुरू केल्याने वाडी, वस्ती व तांड्यावरील वीस पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा पप्पा तुम्ही काही तरी करून वाचवा आशी एक प्रकारची हाक आपल्या पालकांना विद्यार्थी देऊ लागले आहेत.

दुर्गम भागात असलेल्या कमी पटसंख्येच्या शाळेत अधिक विद्यार्थी हे असे शिक्षण घेणारे आहेत ज्यांचे पालक सहा- सहा महिने कामा निमित्त बाहेर गांवी अथवा ऊसतोडणी करता कामाला गेलेले असतात आशा पालकांच्या विद्यार्थ्यांना आता त्यांच्या वाडी, वस्ती व तांड्यावरील शाळेत पटसंख्या कमी असल्या कारणाने जवळच असलेल्या केंद्रतील समुह शाळेत जाऊन शिक्षण घ्यावे लागणार आहे. शाळे पर्यत पोहचण्या करता शासन बसची सुविधा करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु पटसंख्या कमी असलेल्या शाळे पासुन ते समुह शाळे पर्यंत रोज ने- आन करता वेळेस काही अनुसुचीत प्रकार घडल्यास याला जबाबदार कोण असा देखील प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होताना पाहण्यास मिळत आहे. वाडी, वस्ती व तांड्यावरील पालक कामा निमित्ताने बाहेर राज्यात किवा परजिल्ह्यात गेल्या नंतर रोज शाळेत ने - आन करण्याची जबाबदारी आजी-आजोबा घेतात व मवाळकीच्या मायेने रोज विद्यार्थ्यांना शाळेत सोडतात ही बाब सोयीस्कर असताना शासन समुह शाळा चालु करण्याच्या हालचाली करत आहे. यामुळे शेकडो वाडी, वस्ती व तांड्यावरील पटसंख्या कमी असलेल्या शाळा मात्र बंद होऊ शकतात. या शाळा बंद होऊ नये याकरता विद्यार्थी आता आपल्या पालकांना पप्पा आमची शाळा वाचवा आशी हाक देत आहेत. या शाळा बंद झाल्यानंतर येथील अतिरीक्त शिक्षकांचे समायोजन कुठे व कसे होणार असा प्रश्न आता निर्माण होताना पाहण्यास मिळत आहे.

**तीन किमी अंतरावर शाळा उपलब्ध होणार....**

**दुर्गम भागात असलेल्या वीस पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळे ऐवजी तीन किमी अंतरावर समुहशाळा उपलब्ध करून देण्याचे शासनाचे नियोजन असल्याचे सांगण्यात येत असुन त्या दिशेने हालचाली देखील चालु झाल्या आहेत.**



**भावी शिक्षक भावीच राहणार का..?**

**वीस पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद झाल्यानंतर त्या शाळेवरील शिक्षकाचे समायोजन हे अतिरिक्त समुहशाळेच्या ठिकाणी होणार असल्याचे सांगण्यात येत आहे असे झाल्या नंतर शिक्षक भरती ही मात्र कशी होणार असा ही प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला असुन शिक्षक भरती टाळण्या करताच शासन हे पाऊल उचलीत असल्याने भावी शिक्षक हे भावीच राहणार का असे शिक्षण प्रेमी वर्गातुन बोलले जात आहे.**

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र

शनिवार, दि. ७ ऑक्टोबर २०२३





# भारत विकास परिषदेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी स्पर्धांचे आयोजन

## विविध शाळांनी नोंदवला उत्तम सहभाग











धुळे । प्रतिनिधी

राष्ट्रीय स्तरावर सेवाभावी कार्यात देवगिरी प्रांत अंतर्गत कार्यरत असलेल्या भारत विकास परिषद धुळे शाखा यांच्यातर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी दोन अभिनव स्पर्धा नुकत्याच आयोजित करण्यात आल्या होत्या. माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी चेतना के स्वर आणि भारत को जानो या त्या दोन स्पर्धा होत .यामध्ये विविध शाळांनी उत्तम सहभाग नोंदवला. चेतना के स्वर व भारत को जानो या स्पर्धा नुकत्याच घेण्यात आल्या होत्या .त्यामध्ये कमलाबाई शंकरलाल शाळा विजयी झाली, दुसरे पारितोषिक चितळे माध्यमिक विद्यालय व तिसरे गरुड प्री प्रायमरी व प्रायमरी स्कूल ही शाळा विजयी झाली . उत्तम सहभागाबद्दल महाजन हायस्कूल यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले यात सात संघ सहभागी झाले होते. भारत को जानो ही सामान्य ज्ञानावर आधारित परीक्षा सर्व शाळातून घेण्यात आली. आधी लेखी, नंतर क्वीझ स्वरूपात ही स्पर्धा होती. उत्तम सहभाग नोंदवत सीनियर गटात केंद्रीय विद्यालय आणि जुनियर गटात गरुड प्रायमरी प्री प्रायमरी हायस्कूल शाळेने विजेतेपद पटकावले. समूहगन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रसिद्ध गायक प्रा डॉक्टर श्री शेखर रुद्र आणि ऑर्केस्ट्रा फेम गजेंद्र पाटील यांनी काम पाहिले .तसेच भारत को जा नो या स्पर्धेसाठी डॉक्टर श्री एन एम जोशी यांनी काम पाहिले तसेच श्री ललित कुलकर्णी यांनी त्यांना सहकार्य केले .या सर्व स्पर्धांचे नियोजन करण्यात भारत विकास परिषदेच्या मुख्य कार्यकर्त्या डॉ.प्राची शुक्ल, वीणा गानू, वृषाली येवले यांचा सहभाग होता.तसेच भारत विकास परिषद धुळे शाखा अध्यक्ष राजेंद्र जाखडी, सेक्रेटरी सह सेक्रेटरी यांनी मार्गदर्शन केले तसेच रायझिरो संस्था, बांधकाम व्यावसायिक योगीराज मराठे सर यांनी आर्थिक सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद देऊन दोन्ही स्पर्धा यशस्वी केल्या.

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र

शनिवार, दि. ७ ऑक्टोबर २०२३





# देवपूर स्मशानभूमी दुरवस्थेची आमदारांनी केली पाहणी

## आ. शाह यांची संवेदनशीलता तातडीने दिला २० लाखांचा निधी



















धुळे। ठाण्यातील देवपूर येथील स्मशानभूमीची अवस्था अतिशय दयनिय झाली आहे. ज्या ओट्यांवर मृतदेह जाळले जातात, ते ओटे जीर्ण झाल्याने मृतदेह पडण्याची भिती असते. याबाबत नागरिकांनी आ.फारुख शाह यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानंतर आ.शाह यांनी महापालिकेच्या अधिकार्यांना सोबत घेवून स्मशानभूमीची पहाणी केली. स्मशानभूमीतील ओट्यांची झालेली दुरस्था पाहून त्यांचेही मन हळहळले. त्यामुळे त्यांनी स्थानिक विकास निधीतून लागलीच २० लाख रुपयांचा निधी दिला. तसे पत्र आयुक्त अमिता दगडे-पाटील यांना सुपूर्द केले. इतकेच नव्हेतर आणखी निधी लागल्यास मला सांगा, असेही ते म्हणाले. आमदारांची ही संवेदनशीलता पाहून धुळेकरही भारावून गेले. स्मशानभूमीच्या पहाणीप्रसंगी आ.शाह यांच्यासोबत मनपा आयुक्त अमिता दगडे-पाटील, शहर अभियंता कैलास शिंदे, विद्युत विभागाचे उपअभियंता नरेंद्र बागुल, नगरसेवक नासिर पठाण, नगरसेवक सईद बेग, नगरसेवक गणी डॉलर तसेच कैसर अहमद, शहजाद मंसूरी, जुबेर खान, अशोक मराठे, दीपक माळी, संतोष गवळी, हर्षल माळी, नानाभाऊ माळी, तुषार चौधरी, पंकज गुरव, अनिल मराठे आदी उपस्थित होते. देवपूर स्मशानभूमीतील अनेक ओटे मोडकळीस आले आहेत. ओट्यावरील लोखंडी जाळी, रेलिंग तुटलेली आहे. त्यामुळे मृतदेहांना अग्नीडाग देताना अनेक समस्या निर्माण होतात. सरण रचातांना मृतदेह पडेल की काय? अशी भीती नागरिकांमध्ये असते. याबाबत नागरिकांच्या अनेक तक्रारी आ.फारुख शाह यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. म्हणून आज आ.फारुख शाह यांनी देवपूर स्मशानभूमी येथे पहाणी केली.

संकलन : दिपक वाघ